**नियमीत दिवाणी मुकदमा नं. १९/२०१३ मधील निशाण नं. ९८ व ९९ वरील एकत्रीत आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस दाव्यामध्ये सामिल करुन घेण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

२. वादीने ज्यावेळेस हा अर्ज केला त्यावेळेस मयत प्रतिवादी क्र. २ यांच्या मृत्यूला ४ महिने झाले होते. सबब त्यांचे नेमके वारस कोण हे समजण्यासाठी त्यांना काही कालावधी लागला. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी त्यांना विलंब लागला आहे. सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे तीन व्यक्ती या मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस आहेत. प्रस्तुतचा दावा हा हक्कस्थापना व कायम ताकिदीचा असल्यामुळे व मयत प्रतिवादी क्र. २ यांनी कैफियत व प्रतिदाव्याव्दारे दावा मिळकतीचे खरेदीखत होवून मिळण्याची मागणी केल्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांचा Right to Sue अबाधीत राहतो. त्यामुळे त्यांचे वारस दाव्याचे कामी दाखल करुन घेणे आवश्यक आहे. प्रतिवादीने क्र. २ यांनी मृत्युपूर्वी या दाव्यामध्ये प्रतिदावा दाखल केलेला असल्यामुळे त्यांचे वारसांनी स्वत:हून त्यांचे मृत्यूबाबत कल्पना न दिल्यामुळे वादीला प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास विलंब झाला आहे. सबब विलंब झाल्यामुळे प्रतिवादी क्र. २ विरुध्द अबेटमेंट झाला आहे. तो दुर करुन मिळावा आणि त्याकरीता झालेला विलंब क्षमापित करावा अशी मागणी वादी करीत आहे. जो काही विलंब झाला आहे त्याला वादीचा निष्काळजीपणा अगर गैरहेतु नाही. सबब त्यांचा अर्ज मंजुर करावा अशी मागणी वादीने केली आहे.

३. या अर्जास प्रतिवादी क्र. २ यांचे प्रस्तावित वारसांनी निशाण १०४ येथे आपले म्हणणे सादर केलेले असुन त्यांनी वादीच्या अर्जाचे खंडण केले आहे. त्यांच्या मते वादीने ब—याच कालावधीनंतर प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे. प्रतिवादींनी दिनांक २८/९/२०१६ रोजी पुरशीस देवुन देखील ब—याच कालावधी नंतर वादीने हा अर्ज केला आहे. प्रस्तावित प्रतिवादी हा उभादांडा गावचा रहिवासी आहे. त्यामुळे वादीला सदर व्यक्तींची माहिती घेण्यास वेळ कसा काय लागला असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

४. एकंदरीत परिस्थिती पाहता या दाव्यामध्ये प्रतिदावा देखील आहे. प्रतिदावा याला दाव्याचे बरेच नियम लागु व्हायला हवेत. सबब जेव्हा प्रतिदाव्यातील प्रतिवादींचा मृत्यू झाला तेव्हा त्यांचे वारसांना देखील प्रतिदावा पुढे चालविण्यासाठी वारस म्हणुन सामिल करण्याची मागणी तितकीच महत्वाची आहे. सबब या परिस्थितीमध्ये वादीलाच झालेला विलंबाबाबत दोषी ठरवणे मला योग्य वाटत नाही. मात्र वादीची देखील त्याचे दाव्याचे कामी म्हणुन तितकीच जबाबदारी होती. त्यामुळे त्यांनी मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस वेळीच दाव्यामध्ये दाखल करायला हवे होते. सबब एकंदरीत परिस्थितीमध्ये या दाव्याचे कामकाजासाठी प्रतिवादी क्र. २ च्या वारसांना दाव्यामध्ये सामिल करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना वेगवेगळी प्रकरणे चालवावी लागणार आहेत. सबब न्यायाचा समतोल राखण्यासाठी वादीचा अर्ज मंजूर करणे योग्य राहाणार आहे असे मला वाटते. सबब मी खालील आदेश पारित करतो.

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अबेटमेंट रद्द बातल करुन, विलंब क्षमापित करुन या अर्जात नमुद प्रतिवादी क्र. २ च्या वारसांना दाव्यामध्ये सामिल करुन घेण्यात येते.

सही/—

(वि.द.पाटील)

दिनांक— १४/०२/२०१८ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.